नि. दिवाणी दावा क्र.४८/२०२२
शेख महेबुब — वि — शेख रफीक

## आदेश निशाणी क्र.२६

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.३,४, ८ व ९ लेखी जबाब दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवून लेखी जबाब दाखल करण्यास परवानगी मिळणे बाबत केला आहे.

०२. प्रतिवादीचे विधिज्ञ सांगतात की, प्रतिवादींचे विधिज्ञांची बाय पास सर्जरी झाली होती व त्यामुळे ते मुदतीत जबाब दाखल करु शकले नाही. त्यामुळे लेखी जबाब दाखल करण्यास विलंब झाला आहे. आजरोजी प्रतिवादी जबाब दाखल करीत आहे. तरी झालेला विलंब माफ होवून जबाब दाखल करण्याची परवानगी प्रतिवादीने केली आहे.

०३. सदर अर्जास वादीतर्फे नि.क्र.२६ वर म्हणणे दाखल करण्यात आले. वादीतर्फे असे नमूद केले आहे की, प्रतिवादींनी मुदतीत जबाब दाखल केला नसल्याने त्यांना जास्तीत जास्त खर्च लावण्यात यावा. प्रतिवादीने दिलेले कारण हे पटण्यासारखे नाही त्यामुळे प्रतिवादींचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी मागणी वादीने केली आहे.

०४. प्रतिवादी व वादी यांचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०५. प्रस्तुतचा दावा वादीने सरस-निरस वाटणी होवून स्वतंत्र ताबा मिळणे करीता तसेच दि.०२.०१.२००४ रोजीचा दस्त निरर्थक असल्याचे जाहीर करुन मिळणे बाबत दाखल केला आहे. प्रतिवादी हे मुदतीमध्ये लेखी जबाब दाखल करु शकले नाही. मुदतीमध्ये प्रतिवादी लेखी जबाब दाखल करु शकले नाही याचे कारण प्रतिवादींच्या विधिज्ञांची बाय पास सर्जरी झाली होती त्यामुळे वेळ गेल्याचे नमूद केले आहे. सबब प्रतिवादींतर्फे झालेला विलंब सकारण असल्याचे दिसून येते. प्रस्तुत अर्जातील प्रतिवादी क्र.३ व ४ यांना दि. २४.०३.२०२२ रोजी व प्रतिवादी क्र.८ व ९ यांना दि.०१.०४.२०२२ रोजी समन्स बजावणी झाली आहे. प्रतिवादींना लेखी जबाब दाखल करण्यासाठी झालेला विलंब खर्चावर माफ करता येण्यासारखा आहे. तसे करण्याने प्रतिवादींचा लेखी जबाब अभिलेखावर येईल व दाव्यातील गुंतागुंत टळेल तसेच दावा

गुणदोषावर अंतीमतः निकाली काढणे शक्य होईल.

०६. सबब, वरील चर्चेचा, मुळ दाव्याचा व अर्जाचे स्वरुपाचा विचार करता अंतिम न्यायाच्या दृष्टीने प्रतिवादींचा अर्ज निशाणी क्र.२८ हा प्रत्येकी रक्कम रु. २००/- (रुपये दोनशे मात्र) देण्याच्या खर्चावर मंजूर करुन लेखी जबाब दाखल करण्याची परवानगी देण्यात येत आहे. खर्चाची रक्कम वादी यांना देण्यात यावी.

PRACHI RAVINDRA KULKARNI
Digitally signed by PRACHI RAVINDRA KULKARNI
Date: 2023.10.04 11:23:16 +0530

(श्रीमती पी.आर. कुलकर्णी )

दिनांक : ०३.१०.२०२३

सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर

चिखली.

## ***C E R T I F I C A T E***

| | | |
|---|---|---|
| I affirm that, the contents of this PDF file Judgment / order are same word for word, as per original order. | | |
| Name of the Stenographer | : | S.B. Deshpande |
| Name of the Court | : | Jt.C.J.J.D. Court, Chikhali |